लोकमत

नाशिक बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २००९



रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेपसिटीतर्फे आयोजित कार्यक्रमात त्वचादान करण्याचे महत्त्व सांगताना नॅशनल बर्न सेंटरचे डॉ. सुनील केशवानी, नेदरलॅण्डचे रोटरीयन- वुल्फ ऑन्डाचेक, रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेपसिटीचे सचिव डॉ. बाबुलाल अग्रवाल, अध्यक्ष संजव कौशिक, डॉ. बोधा वेल्सली, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थचे अध्यक्ष डॉ. सत्य अग्रवाला व डॉ. राजेंद्र नेहेते.

# किडनी व नेत्रदानानंतर आता त्वचादान

## रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेपसिटीतर्फे नाशकात 'स्किन बँक' स्थापन करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ

नाशिकरोड, दि. २४ (का. प्र.) - विविध प्रकारचे आजार व दुर्दैवाने होणाऱ्या अपघातातून माणसाचे जीव वाचविण्यासाठी किडनी व. नेत्रदान करण्याची चळवळ जोम धरीत असतानाच परदेशात व आपल्याकडील प्रगत शहरात रुजू झालेली त्वचादान करण्याची पध्दत आता नाशकातही सुरू होत आहे. यामुळे आता जळीत रुग्णांच्या मृत्यूच्या प्रमाणात घट होणार असून हे पुण्यकर्म रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेपसिटीतर्फे नाशकात रुजविले जाणार आहे.

नाशिक-पुणे रस्त्यावरील एका हॉटेलात 'त्वचादान' करण्याची प्रक्रिया या विषयावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी नेदरलॅण्डचे रोटरीयन- वुल्फ ऑन्डाचेक, नेदरलॅण्ड येथील 'युरोस्कीन बँके'तील वैद्यकीय संचालक डॉ. बोधा वेल्सली, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे नॉर्थचे अध्यक्ष डॉ. सत्य अग्रवाला, नॅशनल बर्न सेंटरचे डॉ. सुनील केशवानी, रोटरी क्लब ऑफ नाशिक ग्रेपसिटीचे अध्यक्ष संजव कौशिक, सचिव डॉ. बाबुलाल अग्रवाल, प्लॅस्टिक सर्जन डॉ. राजेंद्र नेहेते आदिंनी या उपक्रमाची माहिती देऊन त्वचादान करण्याचे नाशिककरांना आवाहन केले.

भारतात आजही जळीत रुग्णांचा जीव वाचविण्यासाठी पुरेसे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नाही. जळालेल्या रुग्णाला वाचविण्यासाठी परदेशात प्रचलित असलेली 'कंडेक्टीव्ह स्किन डोनेशन' मृत व्यक्तीच्या शरीरावरील त्वचा दान ही पध्दत गेल्या ३५ वर्षांपासून नेदरलॅण्ड, अमेरिका व युरोपमध्ये प्रचलित आहे. या देशात या प्रक्रियेवर आजही अभ्यास सुरू आहे. मृत माणसाची त्वचा काढून ती सुरक्षित ठेवण्यात येऊन ही त्वचाजळीत रुग्णांवर शस्त्रक्रिया करून लावली जाते. यामुळे जळीताच्या वेदना कमी करून त्याला जीवदान मिळते. अशा प्रकारे शस्त्रक्रिया करून युरोपात त्यांना जीवदान देण्यात यश मिळविण्यात आले 'आहे. यामुळे युरोपात जळीत व्यक्ती मरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. भारतात कोलकाता व मुंबई सारख्या प्रगत शहरात या पध्दतीने त्वचा रोपन करून जळीतांचे प्राण वाजविले जातात. हीच प्रक्रिया आता नाशकात सुरू करण्यात येत आहे.

आपल्याकडे ६० टक्के शरीर भाजलेल्या रुग्णांचे प्राण वाचविण्यात वैद्यांना यश येते. परंतु दान केलेली त्वचा उपयोगी आणल्यास यापेक्षा जास्त जळालेला रुग्ण यातून बरा होऊन त्याचे प्राण वाचू शकतात. रक्तदान करणे हे आता आपल्या अंगवळणी पडले आहे. डोळे व किडनी दान करण्याची चळवळ जोम धरीत आहे. त्याचप्रमाणे त्वचा दान करण्याचीही एक चळवळ आता उभी करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. नाशिकमधील मुंबई नाक्यावर असलेल्या 'नेहेते हॉस्पिटल' या रुग्णालयात त्वचा दान करण्याची 'स्कीन बँक' सुरू करण्यात येणार आहे. साधारणत: एक वर्षभरात ही स्कीन बँक सुरू होणार आहे. ज्या व्यक्तींना आपली त्वचा दान्न करण्याची इच्छा आहे त्यांनी या रूग्णालयात डॉ. राजेंद्र नेहेते यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात यावेळी करण्यात आले.

अपघातात त्वचा जळाल्यानंतर जखम खूप मोठ्या प्रमाणात असल्यामुळे शरीरावरील महत्त्वाचे असलेले रक्त, प्रोटीन्स हे घटक जळून मृत पावतात आणि 'सेप्टीसिमिया' होऊन रुग्ण दगावतात. जळीत रुग्णाला ४८ तासाच्या आत जर दुसरी त्वचा मिळाली तर अशा प्रकारचे दुष्परिणाम जळीताच्या शरीरावर होत नाहीत. या त्वचारोपन प्रक्रियेनंतर मोठ्या प्रमाणात जळालेले रुग्णही जगू शकतात. आपल्याकडे जळीत रुग्णाला वाचविण्यासाठी रासायनिक पध्दतीने तयार केलेली कृत्रिम त्वचा वापरली जाते. ही त्वचा रुग्णासाठी उपयोगात आणायला सुमारे प्रचंड खर्च येतो.

काहीं रूग्णांना हा खर्च पेलवत नाही. मृत व्यक्तीचे त्वचा काढण्याच्या प्रक्रियेला पाच हजार रुपये खर्च येतो. कृतिम त्वचा रोपणापेक्षा जर नागरिकांनी त्वचा दान केली तर आपल्याकडे दगावणाऱ्या जळीत रूग्णांची संख्या कमी होण्यास मदत होणार आहे.